# महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत)

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

Academy of Maharashtra Research Upliftment and Training (AMRUT)

जिल्हा कार्यालय पत्ता : प्रशासकीय भवन, तळ मजला,जिल्हाधिकारी कार्यालय परिसर ,वर्धा – ४४२००१

AMRUT

Academy of Maharashtra Research, Upliftment And Training

महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी

**अमृत मुख्यालय,पुणे** **वर्धा जिल्हा कार्यालय**

info@mahaamrut.org.in amrutwardha@gmail.com

☎+९१-९७३०१५१४५० www.mahaamrut.org.in ☎९११२२२७६३२

जा.क्र /अमृत/वर्धा/२०२६-२०२७/३७ दि. १३ /०८/२०२६

प्रति,

**मा. कुलसचिव महोदय,**

**महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय,वर्धा**

विषय – : **'अमृत पराक्रम दिन' श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे – अपराजित योद्धा : वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, रील स्पर्धा आयोजित करण्याबाबत.**

महोदय,

महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुणे ही महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था आहे. अमृत लक्षित गटातील युवक-युवती, उद्योजक तसेच समाजातील विविध घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम प्रभावीपणे राबवित आहे.

दरवर्षी दि. १८ ऑगस्ट रोजी श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांची जयंती साजरी करण्यात येते. चालू वर्षापासून महाराष्ट्र राज्य स्तरावर दि. १८ ऑगस्ट हा दिवस 'अमृत पराक्रम दिन' म्हणून साजरा करण्याचे ठरविण्यात आले आहे. श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांच्या जीवनकार्याचा गौरव करणे तसेच त्यांच्या पराक्रम, नेतृत्व व राष्ट्रनिष्ठा यांची माहिती जनतेपर्यंत, विशेषतः नवीन पिढीतील युवकांपर्यंत पोहोचविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. त्याअनुषंगाने राज्यभर दि. ०१ ऑगस्ट २०२६ ते दि. २८ ऑगस्ट २०२६ या कालावधीत विविध स्पर्धा, व्याख्याने इत्यादी उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

नर्मदे पलीकडे जाऊन उत्तर दिग्विजय करणारा वीर म्हणून श्रीमंत थोरले बाजीराव पेशव्यांचे नाव आदराने घ्यावे लागेल. दक्षिणेतील श्रीरंगपट्टण पासून संपूर्ण मध्य आणि उत्तर भारत बाजीरावांनी मराठ्यांच्या अधिपत्याखाली आणला. अशा या महापराक्रमी योद्ध्याचा १८ ऑगस्ट २०२६ हा जयंती दिन आहे. त्यांच्या शौर्याचा आणि दिग्विजयाचा परिचय सर्व सामान्यांना व्हावा आणि या महान योद्ध्याचे स्मरण राहण्यासाठी अमृत संस्थेतर्फे पराक्रम दिन साजरा करण्यात येणार आहे.

प्रशा./आ.क्र. 2652
पि.बि.नं. 3919
दिनांक 13/08/26

सदर स्पर्धेसाठी दिनांक १ऑगस्ट २०२६ ते २८ ऑगस्ट २०२६ या कालावधीत विद्यार्थ्यांनी स्पर्धा प्रवेशिका पाठवणे अपेक्षित आहे. स्पर्धेचे स्वरूप, बक्षीस, नियोजन व इतर आवश्यक माहिती खाली नमूद केलेल्या वेब पेज वर मिळेल.

वेब पेज URL https://parakramdin.mahaamrut.org.in/#

या पत्रासोबत स्पर्धा वयोगट, विषय व नियम पाठवत आहोत. सदर स्पर्धेस आपल्या शाळा/ महाविद्यालयातून जास्तीत जास्त विध्यार्थ्यांनी सहभागी व्हावे आणि या अनोख्या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी प्रयत्नशील व्हावे यासाठी आपण सर्व विद्यार्थ्यांना यामध्ये सहभागी होण्यासाठी प्रेरित करावे व योग्य ते मार्गदर्शन करावे ही विनंती..

आपला विश्वासू

R.P.Kharate

ऋषिकेश पंडितराव खराटे

जिल्हा व्यवस्थापक, वर्धा

महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत)

जिल्हा व्यवस्थापक वर्धा
महाराष्ट्र संशोधन, उन्नती
व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत)

स्पर्धा विषय : (निबंध, वक्तृत्व व रील्स या सर्व स्पर्धा साठी खालील विषय सामायिक असतील)

१) १८ व्या शतकातील हिंदवी साम्राज्य विस्तारक थोरले बाजीराव पेशवे

२) अपराजित योद्धा थोरले बाजीराव पेशवे

३) थोरल्या बाजीरावांचे संघटन कौशल्य

४) थोरल्या बाजीरावांची युद्धनीती

५) थोरल्या बाजीरावांची स्वामीनिष्ठा

६) थोरल्या बाजीरावांची दिल्ली मोहीम

७) बुंडेलखंड व छत्रसालाचे रक्षणकर्ते थोरले बाजीराव पेशवे

८) थोरल्या बाजीरावांचा जगप्रसिद्ध पालखेड विजय

**निबंध स्पर्धा (३ गट)**

१. शालेय गट

2. महाविद्यालयीन गट

3. खुला गट

स्पर्धेचे नियम –

- शब्दमर्यादा- १००० शब्द
- निबंध मराठी/ हिंदी/ इंग्रजी भाषेत टाईप करून फाइल पी. डी. एफ स्वरूपात अपलोड करावी.
- निबंधासाठी लागणारे संदर्भ अमृत पराक्रम दिनाच्या वेबसाईटवर दिलेल्या लिंक्स, संदर्भ पुस्तके आणि माहिती पुस्तिकेवरच आधारीत असावी.
- बक्षीसपात्र निबंधांबाबत परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

वक्तृत्व स्पर्धा (३ गट)

१. शालेय गट

2. महाविद्यालयीन गट

3. खुला गट

**स्पर्धेचे नियम :**

- आपण स्वत: बोलत असलेला ७ मिनिटां पर्यंत कालावधीचा व्हिडियो अपेक्षित आहे.
- स्वत:चाच व्हिडियो सुस्पष्ट, ठळक आवाजात आणि ओरिजनल असावा.
- कोणत्याही प्रकारचे व्हीज्यूअल इफेक्टस, साऊंड इफेक्टस, ए. आय जनरेटेड इमेजेस किंवा तत्सम स्वरूपाच्या नसाव्यात.
- व्हिडियोची गुणवत्ता उत्तम असावी.

- विषयासाठी लागणारे संदर्भ अमृत पराक्रम दिनाच्या वेबसाईटवर दिलेल्या लिंक्स, संदर्भ पुस्तके आणि माहिती पुस्तिकेवरच आधारीत असावी.
- वरील नियमांचे पालन करून तयार केलेला व्हिडियो अमृत पराक्रम दिनाच्या वेबसाईटवर अपलोड करावा.
- बक्षीसपात्र व्हिडियोचा परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.


रिल्स स्पर्धा (२ गट)

१. महाविद्यालयीन गट

२. खुला गट

स्पर्धेचे नियम-

- वरीलपैकी कोणत्याही एका विषयाला अनुसरून रील्स/शॉर्ट्स बनवणे अपेक्षित आहे.
- रील्स/शॉर्ट्स २ ते ३ मिनिटांपर्यंत असावी.
- विषयाला सुयोग्य ठिकाण (लोकेशन) असावे.
- उत्तम साऊंड क्वालिटी,सुस्पष्ट व्हिडियो असावा.
- रील्स स्वत:च्या आवाजात आणि स्वत:वर शूट केलेली असावी.
- मूळ विषयाच्या संदर्भानुसार आवश्यक असणाऱ्या इमेज,साऊंड,ए. आय चा वापर करून मिक्सिंग केले तरी चालेल.


सत्यमेव जयते
AMRUT
Academy of Maharashtra Research,
Upliftment And Training
महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रवोधिनी
(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
*हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज* यांनी अमरलेल्या स्वराज्याचा विस्तार, संरक्षण आणि हिंदवी साम्राज्याचा झेंडा उत्तरेपर्वत दिमाखात फडकविण्याचे अद्वितीय कार्य *श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे* यांनी केले. त्यांच्या अतुलनीय शौर्य, राष्ट्रनिष्ठा, युद्धनीती आणि नेतृत्वाचा परिचय नव्या पिढीला व्हावा, या पवित्र उद्देशाने *महाराष्ट्र शासनाच्या 'अमृत' संस्थेच्या वतीने राज्यस्तरीय निबंध, वक्तृत्व आणि रिल्स* स्पर्धोंचे आयोजन करण्यात आले आहे.
अपराजित योद्धा
॥ श्रीमंत बाजीराव पेशवे ॥
आम्ही तो थोरल्या आबासाहेबांचे पाईक...!
अमृत पराक्रम दिन
२०२६
निमित्त आयोजित विविध राज्यस्तरीय स्पर्धा
स्पर्धा प्रकार
निबंध स्पर्धा
रील्स स्पर्धा
वकृत्व स्पर्धा
बक्षिसे
1 प्रथम क्रमांक ₹5,000/- व सन्मानचिन्ह
2 द्वितीय क्रमांक ₹4,000/- व सन्मानचिन्ह
3 तृतीय क्रमांक ₹3,000/- व सन्मानचिन्ह
गट
*निबंध स्पर्धा*
१. शालेय गट
2. महाविद्यालयीन गट
3. खुला गट
*वकृत्व स्पर्धा*
१. शालेय गट
2. महाविद्यालयीन गट
3. खुला गट
*रिल्स स्पर्धा*
1. महाविद्यालयीन गट
2. खुला गट
9112227632
https://parakramdin.mahaamrut.org.in/#